# पनवेल महानगरपालिका
## ता. पनवेल जि. रायगड – ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय ०२२ – २७४५८०४०/४१/४२
फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२ – २७४५२३३९
उपायुक्त कार्यालय : ०२२ – २७४५५७५१
ई-मेल : panvelcorportation@gmail.com
वेबसाईट : panvelcorporation.maharashtra.gov.in

जा.क्र./पमपा/पर्यावरण /२८२६/९८/९४३/२०२६

दिनांक :- २३/०९/२०२६

## जाहीर बाजारभाव दरपत्रके सूचना

**"पनवेल महानगरपालिका हद्दीतील नोंदणीकृत बांधकामांच्या ठिकाणी स्थापित करण्यात आलेल्या Air Quality Monitoring Display Board करिता "PMC AQI Central Monitoring Dashboard" विकसित व कार्यान्वित करणे तसेच सदरच्या Dashboard चे २ वर्ष कालावधीकरिता व्यवस्थापन आणि देखभाल करणेकामी त्रयस्थ संस्था नेमणूक करणेबाबत."** याकरिता आर्थिक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेकरिता नोंदणीकृत व अनुभवी संस्थांकडून जाहीर सूचनेद्वारे बाजारभावाची दरपत्रके मागविण्यात येत आहेत .

कामाचे नाव :- पनवेल महानगरपालिका हद्दीतील नोंदणीकृत बांधकामांच्या ठिकाणी स्थापित करण्यात आलेल्या Air Quality Monitoring Display Board करिता "PMC AQI Central Monitoring Dashboard" विकसित व कार्यान्वित करणे तसेच सदरच्या Dashboard चे २ वर्ष कालावधीकरिता व्यवस्थापन आणि देखभाल करणेकामी त्रयस्थ संस्था नेमणूक करणेबाबत.

| अ.क्र. | कामाचा घटकनिहाय तपशील (१+२) | दराची घटक १ व २ नुसार स्वतंत्रपणे रक्कम रूपये (GST व सर्व प्रचलित करांसह) |
|---|---|---|
| १. | **१."PMC AQI Central Monitoring Dashboard" विकसित व कार्यान्वित करणे.**<br><br>**१.१. Public Portal विकसित करणे**<br>• सदर प्रणालीमध्ये नागरिकांसाठी स्वतंत्र Public Portal उपलब्ध करून देणे. या पोर्टलवर पनवेल महानगरपालिका हद्दीतील नोंदणीकृत बांधकाम मॉनिटरिंग ठिकाणे Interactive Map च्या माध्यमातून दर्शविणे.<br>• नकाशावर प्रत्येक नोंदणीकृत ठिकाणासाठी स्वतंत्र Map Marker उपलब्ध करून देणे. संबंधित ठिकाणाची निवड केल्यानंतर त्या ठिकाणाचे नाव, स्थान, सद्यस्थिती व उपलब्ध पर्यावरणीय हवा गुणवत्ता निरीक्षणाची माहिती नागरिकांना पाहणीकरिता उपलब्ध करणे.<br>• सदर प्रणालीद्वारे उपलब्ध होणाऱ्या पर्यावरणीय हवा गुणवत्ता निरीक्षणाच्या माहितीमध्ये प्रामुख्याने AQI, PM2.5, PM10, तापमान व आर्द्रता इत्यादी घटकांचा समावेश राहील. प्राप्त माहितीच्या आधारे संबंधित ठिकाणाची सद्यस्थिती दर्शविणे. | |

- महानगरपालिकेकडून निश्चित करण्यात आलेल्या प्रभावी/अनुमत मर्यादेपेक्षा कोणत्याही पर्यावरणीय घटकाचे मूल्य अधिक आढळल्यास संबंधित ठिकाण नकाशावर लाल रंगाने (Red Status) दर्शविण्याची सुविधा उपलब्ध करणे. मर्यादेत असलेल्या ठिकाणांसाठी स्वतंत्र सामान्य स्थिती दर्शक उपलब्ध करून देणे.

**१.२. User Registration व Approval प्रणाली**

- संबंधित बांधकाम प्रकल्प वापरकर्त्यांसाठी स्वतंत्र ऑनलाइन Registration व Login सुविधा उपलब्ध करून देणे.नोंदणी करताना संबंधित वापरकर्त्याने महानगरपालिकेने निश्चित केलेली आवश्यक माहिती व कागदपत्रे ऑनलाइन स्वरूपात सादर करता यावीत याकरिता प्राप्त अर्ज Admin Module मध्ये उपलब्ध होऊन संबंधित महानगरपालिका अधिकाऱ्यास अर्जाची छाननी करता यावी याकरिता आवश्यक सुविधा उपलब्ध करणे.
- Admin कडून अर्ज View, Verify, Approve, Reject तसेच आवश्यक असल्यास Clarification मागविणे या सुविधा उपलब्ध करणे. अर्ज मंजूर झाल्यानंतर संबंधित User साठी Login Credentials उपलब्ध करून देणे. मंजूर वापरकर्त्यास त्याच्या अधिकारक्षेत्रानुसार स्वतंत्र Dashboard उपलब्ध करून देणे.

**१.३. User Dashboard**

- मंजूर User साठी स्वतंत्र Dashboard उपलब्ध करून देणे. सदर Dashboard द्वारे संबंधित वापरकर्त्यास स्वत:ची नोंदणी व प्रोफाइल माहिती पाहणे व आवश्यकतेनुसार अद्ययावत करणे, नोंदणी/मंजुरीची माहिती पाहणे, अधिकृत Vendor/Monitoring Location ची माहिती व्यवस्थापित करणे तसेच संबंधित ठिकाणांची पर्यावरणीय हवा गुणवत्ता निरीक्षण माहिती पाहणे शक्य होईल याकरिता व्यवस्था करणे.
- तसेच उपलब्ध असलेल्या पर्यावरणीय हवा गुणवत्ता निरीक्षणाच्या आधारे Alerts, Notifications व संबंधित घटकांची सद्यस्थिती पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देणे.

**१.४. Vendor / Monitoring Location Management**

- संबंधित User कडून अधिकृत Vendor किंवा Monitoring Location ची नोंदणी व व्यवस्थापन करता यावे याकरिता प्रत्येक Vendor/Monitoring Location साठी आवश्यक ओळख, संपर्क, स्थान, भौगोलिक माहिती व इतर आवश्यक तपशील नोंदविणेकरिता आवश्यक प्रणालीची व्यवस्था करणे. प्रत्येक Monitoring Location संबंधित User सोबत जोडणे .
- Vendor/Location निहाय पर्यावरणीय हवा गुणवत्ता निरीक्षणाची माहिती स्वतंत्रपणे संकलित व प्रदर्शित करणेकरिता सदर माहिती संबंधित User तसेच अधिकृत Admin अधिकारी यांना त्यांच्या अधिकारानुसार उपलब्ध करून देणे.

**१.५. Environmental Data API Integration**

- संबंधित User किंवा त्यांच्या अधिकृत Vendor कडून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या API/API Access च्या माध्यमातून पर्यावरणीय हवा

| | | |
|---|---|---|
| | गुणवत्ता निरीक्षणाची माहिती PMC AQI Central Monitoring Dashboard वर प्राप्त करणे.<br>• API द्वारे उपलब्ध होणाऱ्या माहितीमध्ये प्रामुख्याने AQI,PM2.5, PM10, Temperature व Humidity या घटकांचा समावेश राहील. प्राप्त माहिती संबंधित बांधकाम व्यावसायिक, Vendor व Monitoring Location सोबत सुरक्षितपण सुयोग्यरित्या जोडणे. API द्वारे उपलब्ध होणाऱ्या माहितीच्या वारंवारतेनुसार ती प्रणालीवर प्रदर्शित करण्यात करणे.<br>• API मध्ये तांत्रिक अडचण, Data Failure, Communication Failure किंवा Data उपलब्ध नसल्यास त्याची नोंद प्रणालीमध्ये होऊन सदर बाब Admin Dashboard वर निदर्शनास आणणे. API/Data Availability ची स्थिती देखील निरीक्षणासाठी उपलब्ध करणे.<br>**१.६. Map-Based Central Monitoring**<br>• पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व नोंदणीकृत बांधकाम ठिकाणांच्य Monitoring Locations चे Interactive Map तयार करून केंद्रीकृत पद्धतीने निरीक्षणाकरिता उपलब्ध करणे.<br>• प्रत्येक Monitoring Location साठी स्वतंत्र Map Marker उपलब्ध करणे. सदर Marker वर संबंधित ठिकाणाची नवीनतम उपलब्ध पर्यावरणीय हवा गुणवत्ता विषयक माहिती दर्शविणे.<br>• निश्चित करण्यात आलेल्या संबंधित मर्यादांशी प्राप्त पर्यावरणीय मूल्यांची स्वयंचलित तुलना करण्यात यावी. कोणत्याही घटकाचे मूल्य निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक झाल्यास संबंधित Monitoring Location ची स्थिती स्वयंचलितरित्या Red/Alert Status मध्ये दर्शविणेची व्यवस्था उपलब्ध करणे.<br><br>**१.७. Alert व Notification प्रणाली**<br>• पर्यावरणीय निरीक्षणामध्ये निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक मूल्य आढळल्यास प्रणालीद्वारे संबंधित Monitoring Location ओळखून त्याबाबत स्वयंचलित Alert निर्माण करण्यात यावा.<br>• सदर Alert संबंधित बांधकाम व्यावसायिक/Vendor तसेच अधिकृत Admin यांना उपलब्ध करून देणे. आवश्यकतेनुसार सदरच्या Alert ची सूचना E-mail व WhatsApp द्वारे पाठविण्याची सुविधा उपलब्ध करून देणे.<br>• सूचनेमध्ये संबंधित बांधकाम व्यावसायिकाचे नाव, Monitoring Location, मर्यादा ओलांडलेला हवा गुणवत्ता विषयक घटक, नोंदविलेले मूल्य, निर्धारित मर्यादा तसेच दिनांक व वेळ इत्यादी घटकांचा सविस्तर तपशील यांचा समावेश असलेली व्यवस्था करणे.<br>• निर्माण झालेल्या सर्व Alerts ची इतिहास नोंद (Alert History) प्रणालीमध्ये उपलब्ध ठेवणे, जेणेकरून पुढील कार्यवाही व संदर्भासाठी त्याचा उपयोग करता येईल. | |

**१.८. Admin Portal**

- "PMC AQI Central Monitoring Dashboard" वर महानगरपालिकेसाठी स्वतंत्र Admin Portal उपलब्ध करून देणे.
- Admin Module मधून संबंधित बांधकाम व्यावसायिक User Registration, अर्जांची छाननी व मंजुरी, User /Vendor Management, User/Account Management, Monitoring Location Management, पर्यावरणीय हवा गुणवत्ता घटकांच्या मर्यादांचे Configuration, API Integration Monitoring, Map-Based Monitoring, Alert/Notification Monitoring, Reports व Historical Data तसेच Activity/Audit Logs यांचे केंद्रीकृत व्यवस्थापन करणे.
- प्रणालीमध्ये महानगरपालिकेच्या विविध अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार आवश्यक User Access/Role-Based Access देण्याची सुविधा उपलब्ध करून देणे.

**१.९. Reports व Historical Data**

- सदर प्रणालीमध्ये आवश्यकतेनुसार विविध अहवाल उपलब्ध करून देणे. त्यामध्ये प्रामुख्याने Construction Site-wise Monitoring Report, Vendor-wise Monitoring Report, Parameter-wise Reading Report, Exceedance/Alert History, Date/Time-wise Environmental Reading, Location-wise Status व API/Data Availability Status etc.यांचा समावेश आहे.
- उपलब्ध Historical Data च्या आधारे ठराविक कालावधीतील पर्यावरणीय हवा गुणवत्ता निरीक्षणाची माहिती दर्शविणे व सदर माहितीच्या आधारे आवश्यकतेनुसार अहवाल तयार करणे .

**१.१०. Data Security व Audit Trail**

- सदर प्रणालीमध्ये नोंदणीकृत वापरकर्त्यांच्या माहितीची सुरक्षितता राखण्यासाठी आवश्यक Login Authentication व Role-Based Access Control उपलब्ध करून देणे.
- Admin/User कडून प्रणालीमध्ये करण्यात आलेल्या महत्त्वाच्या नोंदी, बदल, मंजुरी, नकार, Configuration बदल व इतर प्रशासकीय कार्यवाहीची Audit Log मध्ये नोंद ठेवणे.
- प्राप्त पर्यावरणीय हवा गुणवत्ता विषयक माहितीची दिनांक व वेळेसह नोंद ठेवणे, जेणेकरून आवश्यकतेनुसार संबंधित कालावधीतील माहितीचा संदर्भ घेता येईल.

**१.११. भविष्य कालावधीमध्ये "PMC AQI Central Monitoring Dashboard मध्ये आवश्यक तांत्रिक सुधारणा व अद्ययावतीकरण करणे."**

- मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल सुमोटो जनहित याचिका क्र. ०३/२०२३ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे निर्देश तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार गठित करण्यात आलेल्या मा. High Power Committee (HPC) यांचेकडून पनवेल महानगरपालिकेस

| | | |
|---|---|---|
| | वेळोवेळी प्राप्त होणारे निर्देश, मार्गदर्शक सूचना व अनुपालनाच्या अनुषंगाने "PMC AQI Central Monitoring Dashboard" या प्रणालीमध्ये आवश्यकतेनुसार सुयोग्य बदल, सुधारणा, अद्ययावत सुविधा (Modification/Upgradation) व आवश्यक तांत्रिक सुधारणा करणे.<br>• सदर प्रणालीमध्ये भविष्यातील आवश्यकता, नवीन निर्देश, अहवाल प्रणाली, निरीक्षण व अनुपालनाच्या गरजेनुसार आवश्यक असलेल्या नवीन सुविधा विकसित करणे तसेच विद्यमान सुविधांमध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा करून प्रणाली कार्यक्षम, अद्ययावत व वापरास सुलभ ठेवणे. | |
| २. | **२. "PMC AQI Central Monitoring Dashboard" चे २ वर्ष कालावधीकरिता तांत्रिक व्यवस्थापन व देखभाल करणे.**<br>• "PMC AQI Central Monitoring Dashboard" ही प्रणाली कार्यान्वित झाल्यापासून सदर प्रणालीचे पुढील २ वर्ष कालावधीकरिता सुयोग्य तांत्रिक व्यवस्थापन व देखभाल करणे. | |
| | **दराची घटक १+२ नुसार एकत्रित रक्कम रूपये (GST व सर्व करांसहित )** | |

सदरच्या बाजारभावाची दरपत्रके कार्यालयीन वेळेत दिनांक ०५ / १० /२०२६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका पर्यावरण विभागात सादर करावीत. सदरची दरपत्रके दिनांक ०६/१०/२०२६ रोजी उघडण्यात येतील.

- सदरची दरपत्रके केवळ आर्थिक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेकरिता मागविण्यात येत आहेत.
- सदरची दरपत्रके सीलबंद लिफाफ्यात पर्यावरण विभागामध्ये सादर करणे अनिवार्य आहे.
- कोणतेही दरपत्रक नाकारण्याचा अधिकार पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.
- विहित कालावधीनंतर आलेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.
- सदरच्या दरपत्रकांसोबत संस्था नोंदणी प्रमाणपत्र , मागील ०३ वर्षांचे आयकर विवरणपत्र , पॅनकार्ड , GST Registration Certificate इत्यादी कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहील.

**सही/-**
**उपायुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**